म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालज्ञानमाला
वा. नं. ९३

बालज्ञानमाला

# आनंदीबाई पेशवे

## (चरित्र.)

सं. ठाणें
वा. न.

लेखक
चिंतामण गणेश कर्वे.

पुष्प
१६१ वें.

ग्र.

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बालवाङ्मय
ग्रा. क्र. १६९०

सन-१९४०.

आनंदीबाई पेशवे

IRBK-0101690

11 DEC 1974

म.ग्रं.सं.पां.

14 AUG 1976

IRBK-0101690

IRBK-0101690

श्रीसयाजी बालज्ञानमाला — पुष्प १६१ वें

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible] शाखा.
ग्रा. क्र. ..१६९०.. नों. दि. ..........
वि. ....[illegible].... क्र. ..................

# आनंदीबाई पेशवे

लेखक
**चिंतामण गणेश कर्वे**
संपादक — महाराष्ट्रीय ज्ञानकोश व शब्दकोश, 'मानवी संस्कृतीचा इतिहास', 'प्राच्य आणि पाश्चात्य नीति-ध्येयें' इ० चा कर्ता

आवृत्ति १ ली

प्रती १००० किंमत आठ आणे

प्रकाशक
चिंतामण गणेश कर्वे
२०४ सदाशिव, वाघवाडी, पुणें २

मुद्रक
लक्ष्मण नारायण चापेकर
आर्यसंस्कृति मुद्रणालय, १९८(१७) सदाशिव, टिळक रस्ता, पुणें २

म.ग्रं.सं.ठाणे

# विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें विद्याभिलाषी कै. श्रीमंत सरकार महाराजसाहेब सर सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादूर, जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई., एल्‌एल्. डी., यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजांतून "श्रीसयाजी बालज्ञानमालें"त विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

तदनुसार **आनंदीबाई पेशवे** या नांवाचा ग्रंथ श्री. **चिं. ग. कर्वे** यांजकडून तयार करविला, तो उक्त मालेंतून १६१ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| भाषान्तरशाखा,<br>प्राच्य विद्यामंदिर,<br>बडोदें | भा. प्र. कोठारी<br>भा. मदतनीस | ज्यो. मा. मेहता<br>विद्याधिकारी,<br>राज्य बडोदें |

१-३-४०

# प्रस्तावना

आनंदीबाईचें चरित्र लिहिण्यासारखें आहे व तेंहि मुलां-च्यासाठीं, ही गोष्ट बडोदें सरकारच्या ओरिएंटल इन्स्टिटयूट-च्या मनांत कशी आली याचें आश्चर्य वाटत असलें तरी, इन्स्टिटयूटचें अभिनंदन करावेंसें वाटतें. कारण आनंदीबाई-सारख्या अनेक ऐतिहासिक व्यक्तींसंबंधीं जे नुसतेच गैर-समज आजवर राहिले आहेत, त्यांची उपलब्ध ऐतिहासिक साधनांच्या आधारें छाननी होऊन त्या व्यक्ती सत्य स्वरूपांत विद्यार्थ्यांना दिसाव्यात व त्यांचे जे कांहीं गुण असतील ते त्यांनीं उचलावेत, हाच सद्धेतु अशा व्यक्तींचीं चरित्रें लिहविण्याच्या मुळाशीं असला पाहिजे.

आनंदीबाईविषयीं बहुतेक सर्व लहानथोरांना एवढीच माहिती असते कीं, तिनें आपल्या पुतण्याचा राज्यप्राप्ती-साठीं खून करविला, नवऱ्याला वाईट मार्गाला लाविलें व मराठेशाही बुडविण्यास मदत केली. एवढाच तिचा दुर्लौ-किक तिच्या काळापासून आतांपावेतों चालत आला आहे.

पेशवे दप्तरांतील कागद प्रसिद्ध होऊं लागले तेव्हां, व विशेषत: "आनंदीबाईची दिनचर्या" हा या कागदांचा चवथा खंड प्रसिद्ध झाल्यापासून, बाई कर्तबगार होती, नवऱ्याच्या दु:स्वभावामुळें आणि दुर्वर्तनामुळें तिची वाजवीपेक्षां अतिशयच जास्त बदनामी झाली, असें इतिहासकारांना कळून चुकलें. तिला अनुकूल परिस्थिति लाभती तर ती नाना फडणिसाऐवजीं अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत मराठे साम्राज्याची 'डिक्टेटर' बनली असती; निदान कोल्हापूरच्या ताराबाई-जीजाबाईप्रमाणें तिचें कांहीं नांव होतें. आज नुसता दुर्लौकिकच तिच्या वांटयाला आला आहे. हा घोर ऐतिहासिक अन्याय आहे, अधर्म आहे, असा आरोप एखाद्या अर्वाचीन संशोधकानें केल्यास तो सर्वस्वीं खोडून काढणें कठीण जाईल. असो.

एखाद्या विवाहित स्त्रीचें जीवनचरित्र लिहितांना तिच्या पतीचें चरित्र रेखाटणें अत्यवश्य होतें. नवऱ्याचा आयुष्यक्रम हा ताणा व त्याच्या उभ्या धाग्यांतून बायकोच्या जीवनाचे आडवे धागे (बाणा) ओंवून घ्यावे लागतात; म्हणजेच स्त्रीचा जीवनपट तयार होतो. या दृष्टीनें पाहतां, राघोबादादाचा जो आनंदीबाईच्या लग्नानंतरचा इतिहास जरूर तेवढा दिला आहे, तो योग्यच वाटेल. आनंदीबाईसंबंधीं इतकी एकत्रित केलेली माहिती कोठेंच सांपडणार

नाहीं. ही सर्व माहिती जमविण्यासाठीं १ पेशवे दप्तर (विशेषत: खंड ४ था), २ पेशव्यांच्या रोजनिशा, ३ खरे आणि पारसनीस यांचे ग्रंथ, ४ इतिहाससंग्रह मासिक, ५ मराठी रियासत (मध्यविभाग आणि उत्तरविभाग), ६ ज्ञानकोशाचे विभाग (विशेषत: ७, १२, १६, १८, १९), ७ भारत इतिहास संशोधक मंडळाचीं नियतकालिकें, इत्यादि अनेक ऐतिहासिक साधनांचा उपयोग करावा लागला. या सर्व ग्रंथकारांचा लेखक अत्यंत ऋणी आहे. मुलांसाठीं हें चरित्र असल्यानें जागजागीं आधार दिले नाहींत. ते तसे दिले असते तर पुस्तकाचें स्वरूप एखादा रुक्ष संशोधकीय निबंध, याप्रमाणें बनतें. शेवटीं, या नवीन विषयावर लिहिण्याची संधि आणून दिल्याबद्दल वडोदें सरकार आणि ओरिएंटल इन्स्टिट्यूट यांचे मन:पूर्वक आभार मानतों.

१९ एप्रिल १९३८ **चिंतामण गणेश कर्वे**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | थोडी ओळख | १ |
| २ | पेशव्यांची हिंदुपदपातशाही | ३ |
| ३ | आनंदीबाईचें माहेर व सासर | ६ |
| ४ | आनंदवल्ली | ८ |
| ५ | 'ध'चा 'मा' कोणीं केला ? | १३ |
| ६ | सात महिन्यांची पेशवाई | १९ |
| ७ | राघोबाचा पळ आणि आनंदीबाईचा वनवास | २५ |
| ८ | शेवटचा आधारहि तुटला | ३५ |
| ९ | वैधव्यदशा आणि बंदीवास | ४१ |
| १० | शेवटीं काय ? | ५१ |
| ११ | परिशिष्ट | ५३ |

# आनंदीबाई पेशवे

## १

### थोडी ओळख

दुसरा पेशवा बाजीराव याचा, अटकेवर मराठ्यांचा झेंडा फडकविणारा मुलगा जो रघुनाथराव किंवा 'राघो भरारी', त्याची आनंदीबाई ही बायको होय. पेशव्यांच्या घराण्यांत तीनच कर्तबगार स्त्रिया होऊन गेल्या : पहिली राधाबाई— बाळाजी विश्वनाथ पेशव्याची बायको, दुसरी बाळाजी बाजी-राव उर्फ नानासाहेब पेशवा याची बायको— गोपिकाबाई, व तिसरी आनंदीबाई. राधाबाईविषयीं आतांपर्यंत फारशी माहिती नव्हती, पण पेशव्यांचें कांहीं जुनें दप्तर छापून निघाल्यानें या वीरपत्नी—वीरमातेची कामगिरी लोकांच्या नजरेंत भरूं लागली आहे. गोपिकाबाईहि आपल्या आजेसासूसारखीच फार हुशार व तेजस्वी; पण भोंवतालच्या मंडळीच्या एकत्र विचारानें चालणें व माणसें सांभाळून घेणें तिला जमलें नाहीं; त्यामुळें ती मागें पडली व अज्ञातवासांत शेवटपर्यंत राहिली. तिची जाऊ, जिचें

चरित्र पुढें देण्यांत येत आहे, ती आनंदीबाई मात्र फार गाजली; पण दुर्लौकिकानें ! गृहकलह पेटवून घराण्याचा सत्यानास करणाऱ्या एखाद्या स्त्रीस आनंदीबाईची उपमा देतात. खरें पाहतां, ही बाई दिसते तितकी वाईट नव्हती. ती मानी, महत्त्वाकांक्षी व तडफदार असल्यानें व राघोबादादा– तिचा नवरा– फार भोळा आणि स्वार्थसाधू बनल्यानें, आनंदीबाई पेशवाईतील राजकारणांत निराळ्या तेजानें चमकली. पिंजऱ्यांत कोंडलेली वाघीण जशी पिसाळते तशी, तिच्या कर्तबगारीला वाव न मिळाल्यानें व उलट तिला बराच काळ बंदीवासांत राहावें लागल्यानें, ती भडकली. तेव्हां साहाजिकच तिचें नांव बदू झालें. माणसांतील चांगले गुण ओळखून त्या मानानें त्याची किंमत ठरविणें इष्ट आहे. कालान्तरानें गैरसमज नाहींसे होतात व माणूस मूळच्या खऱ्या स्वरूपांत दिसतो.

# २

## पेशव्यांची हिंदुपदपातशाही

ज्या काळीं आनंदीबाई जन्माला आली तो काळ मराठ्यांच्या भरभराटीचा होता. पेशव्यांनीं शिवाजी महाराजांचें राज्य वाढवत वाढवत दिल्लीच्या मोंगल पातशाहीसहि मागें टाकलें होतें. इकडे पंजाब तर तिकडे बंगाल व खालीं कर्नाटक, या भागांतून मराठ्यांचा अंमल होता. "उत्तरेकडील व दक्षिणे-कडील सुवर्णनद्यांचा संगम मध्यें पुण्यास केला" गेला. नानासाहेब पेशवे चांगले शूर, शहाणे व रसिक असून सुधा-रणाप्रियहि होते. त्यांच्या वेळीं पुणें हें साऱ्या हिंदुस्थानचें नाक बनलें होतें. या मराठ्यांच्या राजधानीचें ऐश्वर्य बऱ्याच शाहीर कवींनीं वर्णिलें आहे.

"वसविलें त्यांनीं पुणें शहर टुमदारीचें ।
जागोजाग बांधले दाट नळ पाण्याचे ।
ठायिं ठायिं शोभती हौद एकफर्म्याचे ।
धनी कृपावंत प्रभु कल्याण करी रयतेचें ॥

लंकाच पुण्यामध्यें लेश न दारिद्र्याचें ।
शहरांत घरोघर सावकार गब्बर घरचे ।
सरदार एकाहून एक श्रीमंतांचे ।
लढणार शिपाई किती सांगू मी वाचें ॥
हत्ती घोडे रथ अंबारी थवे पालख्यांचे ।
सरकारवाड्याभोंतालीं झुलती बाहारीचे ।
जागोजाग वस्ती भरदार, गर्दी बाजार,
कमती नसे कांहीं ।
पुणें शहर अमोलिक रचना दुसरी नाहीं ॥

याप्रमाणें पेशवाईंतील एक प्रख्यात शाहीर कवि राम जोशी यांनीं पुणें शहरावर पोवाडा रचिला आहे.

मोहिमांवर स्वतः नानासाहेब जात; व आपला सख्खा भाऊ रघुनाथराव उर्फ दादासाहेब व चुलतभाऊ सदाशिवराव उर्फ भाऊसाहेब यांनाहि वेळोवेळीं पाठवीत. दादानें उत्तर हिंदुस्थानांत चांगला पराक्रम करून नांव मिळविलें होतें. दादा फार मोठा नव्हता. त्याचा जन्म १७३४ सालांतला; म्हणजे लहानपणापासूनच आपल्या वडिलांप्रमाणें व भावाप्रमाणें तो लढाया मारूं लागला होता. सर्व पेशवे घराण्याचाच असा कित्ता होता. त्या वेळच्या चालीप्रमाणें दादाचें लग्न नवव्या वर्षीं झालें. ही त्याची पहिली बायको जानकी स्वभावानें चांगली असे. पण ती लग्नानंतर तेरा वर्षांनीं म्हणजे १७५५ त वारली. तिला मूलबाळ कांहीं नव्हतें. याच सालीं नानासाहेब पेशव्यांना तिसरा मुलगा झाला; तोच पुढला नारायणराव पेशवा होय.

दादा आणि नारायण या चुलत्यापुतण्याचें बरेंच सख्य असे. दादा फार उतावीळ आणि तापट स्वभावाचा. त्यामुळें त्याचें कोणाशीं फार दिवस जमत नसे. सदाशिवरावाशीं त्याचें लहानपणापासूनच वांकडें व पुढें पुढें तर दरबारच्या कामांवरून त्यांच्यात मोठे खटके उडूं लागले. दादा मोहिमांवर खुशीनें जाई व बरेच प्रदेशहि जिंकी; पण नंतर त्यांची नीट व्यवस्था लावण्याऐवजीं गोंधळ घालून भलें कर्ज करून ठेवी. तो जसा फार चंचल आणि धरसोड वृत्तीचा, तसाच हलक्या कानांचा असे. त्यामुळें या पराक्रमी पुरुषाजवळ चांगला सल्ला देणारा आणि त्याच्यावर वजन ठेवून त्याच्या कामाकाजाची सुव्यवस्था लावणारा माणूस असल्याखेरीज त्याचें आयुष्य सुखाचें होणें कठीण. दादाचा आणि त्याच्या सर्वच कुटुंबाचा शेवट जो वाईट झाला त्याला पुष्कळसें कारण दादाचा स्वभाव. 'स्वभावो दुरतिक्रमः' ही म्हण याच्या बाबतींत चांगली प्रत्ययाला येते. असो.

या काळांत मराठ्यांचा प्रतापसूर्य मध्यान्हीं होता. नानासाहेब, भाऊसाहेब, दादासाहेब, मल्हारराव होळकर, दत्ताजी शिंदे, गोविंदपंत बुंदेले, बळवंतराव मेहेंदळे, दमाजी गायकवाड, रघूजी भोंसले, मुरारराव घोरपडे इत्यादि पुरूष स्वपराक्रमानें तळपत होते. साऱ्या हिंदुस्थानालाच नव्हे तर बाहेर इस्तंबूलपर्यंत मराठ्यांचा मोठा दरारा होता.

---

म. ग्रं. सं. ठाणे.

# ३

## आनंदीबाईचें माहेर व सासर

आनंदीबाई ओकांच्या घराण्यांतील. रत्नागिरी जिल्ह्यांतील गुहागर गांवचे राघो महादेव ओक यांची ही मुलगी. तिचा जन्म बहुधा १७४७ सालांतला असावा. राघो महादेवास मुलगा मुळींच नव्हता. तेव्हां त्यानें दत्तक मुलगा घेतला. हा आनंदीबाईचा भाऊ नारायणराव ओक तिच्यावरच बराचसा अवलंबून असे. आनंदीबाई कोपरगांवीं असतांनाहि तो भाऊ-बिजेला जात असे. आनंदीबाईची आई काकूबाई हिला पांच हजारांचें वर्षासन मिळे.*

राघोबादादाची पहिली बायको १७५५त वारल्यावर लागलीच आनंदीबाईचें लग्न जमलें. लग्नसमारंभ कृष्णातीरीं गलगलें येथें झाला. त्या वेळीं दादा स्वारीवरच होता. तेव्हां अर्थात्


*पुण्यांत नेने घाटावरील हल्लीं डॉ. नि. स. दाते यांच्याकडे असलेल्या वाड्याला अद्याप 'आनंदीबाईचें भातुकलीचें घर' असें म्हणतात. तो वाडा पूर्वी ओकांचा असे.

मोठया थाटाचें लग्न झालें नाहीं. आनंदीबाई रूपानें चांगली होती. तिची सासू–पहिल्या बाजीरावाची बायको– या वेळीं जिवंत होती; ती पुढें तीन वर्षांनीं वारली. तेव्हां घरांत एक सासू, गोपिकाबाई, सगुणाबाई (नानासाहेबांचा आणखी एक भाऊ जनार्दन म्हणून होता त्याची बायको) व पार्वतीबाई (भाऊसाहेबांची बायको) या तिघी जावा, व विश्वासरावाची बायको लक्ष्मीबाई– ही सून, अशी खाशी बायका मंडळी होती. यांमध्यें गोपिकाबाईचा साहजिकच मालकीण म्हणून वरचष्मा असे. तेव्हां या मोठया जाऊबाईची मर्जी सांभाळण्याचें अवघड काम आनंदीबाईला करावयाचें होतें. वयानें या वेळीं तीच सर्वांत लहान पण चुणचुणीत. तेव्हां कांहीं वर्षें तिचें कोडकौतुक झालें. नानासाहेबांच्या मृत्यूपर्यंत राघोबाचें आणि गोपिकाबाईचें बरें असे. राघोबा मोठया भावजयीशीं आदरानें वागे. बायको नवी व लहान असल्यानें ती जावेशीं एवढ्यांतच भांडेल हें शक्य नव्हतें. भाऊसाहेबांशीं मात्र गोपिकाबाईचें चांगलें वितुष्ट होतें; त्याची अखेर पानिपतच्या युद्धांत वाईट झाली. भाऊसाहेबांची बायको मात्र सालस व भोळीभाबडी होती. तिचें कोणाशींच केव्हांहि फारसें वांकडें आलें नाहीं.

# ४

# आनंदवल्ली

नानासाहेबांच्या मृत्यूनंतर माधवरावाला पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. तथापि सर्व कारभार राघोबाच्या तंत्रानेंच चाले. त्याच सालीं माधवरावाचें लग्न त्यानें करून दिलें व निजाम स्वारी करून आला असतां त्याचा त्यानें चांगलाच पराभव केला. पण राघोबाला मुत्सद्दीगिरी माहीत नसल्यानें लवकरच माधवरावाला राज्यसूत्रें आपल्या हातीं घ्यावीं लागलीं. यामुळें या वेळेपासून पेशवाईंत गृहकलहाला सुरुवात झाली. माधवराव अतिशय कडक असे. त्याला विरोध, लबाडी, फितुरी मुळींच खपत नसे. तेंव्हां त्याची आई गोपिकाबाई हिनेंहि शहाणपणानें संसारांतून लक्ष काढून घेतलें व नासिकाजवळ गंगापूर म्हणून गोदावरीकांठीं एक रम्य ठिकाण आहे तेथें जाऊन मरेपर्यंत राहिली. पण राघोबा मात्र आपल्या हातचा कारभार गेल्यामुळें रुसून निजामाला जाऊन मिळाला व पेशव्यावर स्वारी करून येऊन त्याचा पराभव केला. माधवराव फार शहाणा आणि



शुक्रेश्वराचें देवालय. याचा दरवाजा पेशव्यांच्या वाड्याचा आहे.

[ श्री. य. रा. गुप्ते यांच्या कृपेनें ]

खरा देशाभिमानी. मराठ्यांचें राज्य विस्कळित होऊन मोडतें आहे असें पाहून, तो चुलत्याला आपण होऊन शरण गेला व राज्यकारभार पुन्हां त्याच्या हातीं दिला. याचा परिणाम लागलाच असा झाला कीं, दादानें निजामाचा पक्ष सोडला, व उलट त्याच्याशीं युद्ध सुरू केलें. निजाम साहजिकच चवताळून पुण्यावर चालून आला व त्यानें पुण्याची जाळपोळ केली. आनंदीबाई, रमाबाई (माधवरावाची बायको), सगुणाबाई या पेशव्यांच्या घरांतील खाशा बायका पुणें सोडून पुरंदरला जाऊन राहिल्या (१७६३). राक्षसभुवन येथें अखेर पेशव्यांनीं निजामाला पार शरण आणून सुमारें तीस वर्षें त्याला डोकें वर काढूं दिलें नाहीं.

आपल्याला स्वतंत्र व मोठी नेमणूक करून देण्याविषयीं राघोबाची माधवरावाजवळ सारखी कुरकूर चालूच होती. तो अर्धें राज्यच मागत होता पण रावसाहेबानें समजूत घालून नासिक परगण्यांत सुमारें सहा लाखांपर्यंतचा मुलूख दादाला तोडून दिला. तेव्हां दादा तिकडे जाऊन राहिला. त्रिंबक आणि कोपरगांव येथें त्यानें वाडे बांधिले. नासिकच्या पश्चिमेस तीन मैलांवर एक चावंडस नांवचें लहान गांव होतें. तें आनंदीबाईला फार आवडलें. गोदेचा रमणीय प्रवाह जवळून वाहत होता; आजूबाजूस बेलाचीं झाडें फार; गांव चांगला उंचावर वसला होता; त्र्यंबकेश्वर पण जवळच. तेव्हां धर्मभोळ्या राघोबासहि

हें ठिकाण पसंतीस येऊन तेथें बिऱ्हाड केलें. लवकरच येथें आनंदीबाई प्रसूत होऊन पुत्ररत्न झालें (२ आगष्ट १७६४). मग काय विचारतां ? आनंदीआनंद ! गांवचें नांवहि **आनंदवल्लीच** ठेविलें व मोठा वाडा बांधण्यास काढला. वाडयाला किल्लयासारखी तटबंदी केली– अशी कीं दुसरा पुण्याचा शनवारवाडाच. या राघोबाच्या राजधानींत फौज आणि आश्रित यांचा मोठाच परिवार राहिला. देवपूजा आणि व्रतवैकल्यें यांचें फार मोठें अवडंबर राघोबाचें असे. नेहमीं उपासतापास आणि ब्राह्मणभोजनें. दानधर्महि मोठा. त्यामुळें पंडित, पुराणिक, जोशी, वैद्य, गुरव, गोसावी, कानडे ब्राह्मण, शागीर्द इ०चा मोठा भरणा आश्रितांमध्यें असून शिवाय गवई, वादक, नटवे, नाटकशाळा या चैनीकरमणुकीच्या गोष्टी असतच. तेव्हां चार वर्षें आनंदवल्ली फार गजबजलेली होती.

आनंदवल्लीस झालेला मुलगा भास्कर फार दिवस जगला नाहीं. पेशवाईला वारस समजून याचा मान-सन्मान मात्र फार झाला. भास्करला दादानें छत्रपतीचें प्रतिनिधिपद देऊन सरदार राजेबहाद्दर यांना त्याचा मुतालिक नेमलें. हा मुलगा मेल्यावर, आपल्याला पुढें पुत्रयोग नाहीं असें राघोबाच्या मनानें घेतलें. आपण पेशवा होऊन आपल्याच वंशांत पेशवाई राहावी, ही त्या नवराबायकोची महत्त्वाकांक्षा. या वेळीं त्यांना

एक मुलगी होती; तिचें नांव दुर्गा. पण मुलगा नाहीं म्हणून तळमळ लागून राहिली. पुतण्या नारायणराव यावर लोभ फार. पण त्याची आई त्याला चुलता-चुलतीजवळ ठेवण्यास तयार नसे. गोहदच्या स्वारीस जातांना त्याला बरोबर नेण्याची गोष्ट दादानें काढिली असतां गोपिकाबाईनें नकार दिला होता; याबद्दल माधवरावानेंहि तिला दोष लावला. नारायणरावास जर दादाच्या हवालीं मुलाप्रमाणें केलें असतें तर एवढी पुढची यादवी माजली नसती; व दादानें अमृतरावास जें दत्तक घेतलें (१७६८) व तिऱ्हाइताचा मुलगा जवळ केला, तेंहि टळलें असतें. पण होणार तें चुकत नाहीं !

दादाला घरांत भांडणें करण्यास वेळ सांपडूं नये म्हणून माधवरावानें त्याला पानपतचें अपयश धुवून काढण्यासाठीं उत्तरेकडे मोहिमेवर पाठविलें. पण या खेपेस राघोबा अपयश घेऊन आणि भारी कर्ज करून परत आला व उलट आपणाला अर्धें राज्य तोडून देण्याविषयीं पुतण्याशीं भांडूं लागला. त्यानें पेशवाई मिळविण्याचीं कारस्थानें आनंदवल्लीहून आनंदीबाईच्या तंत्रानें सुरू केलीं. जवळ १५००० खडी फौज बाळगिली व नागपूरचे भोसले, मुंबईचे टोपकर इंग्रज, बडोद्याचे गायकवाड आणि भागानगरचे निजाम यांच्याशीं त्यानें खलबतें चालविलीं. तेव्हां माधवरावानें राघोबाच्या फौजेवर धोडप येथें हल्ला करून त्याला कैद केलें (१७६८) आणि

शनवारवाड्यांत आणून ठेविलें. यानंतर दादाचें आनंदवल्लीस राहणें झालें नाहीं; व त्या स्थळाला उतरती कळा लागली.

## ५

## 'ध'चा 'मा' कोणीं केला ?

माधवराव पेशवा हा फार हुशार, पराक्रमी, आणि मुत्सद्दीहि होता. पानपतला मराठ्यांचें गेलेलें यश त्यानें पुन्हां बहुतेक परत मिळविलें. पण त्याला घरांत आणि बाहेर अतोनात त्रास असे. त्यामुळें शरीरप्रकृति नीट राहत नसे. यांतच त्याला क्षयासारखा असाध्य रोग जडला. पुष्कळ औषधोपचार झाले पण रोगाचें पाऊल पुढेंच ! शेवटीं आपलें इष्ट दैवत जो थेऊरचा गणपति–अष्टविनायकांपैकीं एक, त्याच्या देवळांतच तो जाऊन राहिला. आपल्या मागें एवढें राज्य कोण सांभाळणार, नारायणराव लहान व पोरस्वभावाचा, घरांत दादासाहेबांची अशी फितुरी, यासारखी विवंचना रावसाहेबाला लागून राहिलेली; जीव अडकला ! तेव्हां नाना फडणीस, सखारामबापू, हरिपंत फडके, व त्रिंबकमामा पेठे यांनीं सरकारास अभिवचनें देऊन मागें कांहीं काळजी न करण्याविषयीं विनविलें, दादासाहेबांची कैदेंतून मुक्तता केली

व त्यांना थेऊरला बोलावून घेतलें. माधवरावानें आपल्या चुलत्याच्या पायां पडून त्याच्या हातांत भावाचा हात देऊन सर्वांच्या देखत त्याची प्रार्थना केली कीं, "आपण हा नारायण आणि राज्य आतां सांभाळावें; मागचें सर्व विसरून जाऊन सर्व मंडळींनीं एकमतानें चालावें." आमच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत नारायणरावास अंतर देणार नाहीं, असें उलट दादासाहेब व सर्व कारभारी यांनीं माधवरावाला वचन दिलें. तेव्हां माधवरावानें सुखानें प्राण सोडला. रमाबाईनेंहि सती जातांना धर्मशिळेवर उभी राहून अशीच सर्वांची प्रार्थना केली, आनंदीसासूबाईंनाहि नारायणभाऊजींस ओटींत घेण्याबद्दल गहींवरून निरोप सांगितला. उत्तरक्रिया झाल्यानंतर नारायणरावाकरितां सातारच्या छत्रपतीकडून पेशवाईचीं वस्त्रें आणण्यासाठीं पुण्याहून निघतांना, दादा-साहेब आपणांस बावीस लक्षांचा सरंजाम प्रथम कबूल करा, म्हणून हटून बसला. नारायणरावानें कारभार सर्व तुमचाच आहे, असें परोपरीनें विनविलें; पण दादा ऐकेना. तेव्हां आनंदीबाईनें नवऱ्यास उपदेश केला कीं, सरंजाम घेण्या-ऐवजीं नारायण म्हणतो त्याप्रमाणें स्वतःच वडीलपणानें कारभार करावा. तेव्हां कोठें दादाची समजूत पटली व तो नारायणरावाला घेऊन सातारला गेला.

या वेळीं नारायणरावाची आई गोपिकाबाई पुण्यास

आली होती व तिचा एक उद्देश, राज्यकारभार आपल्या हातीं घेऊन दादा आणि त्याच्या पक्षाचे लोक दूर करावेत, असा होता. आनंदीबाईनें हें ओळखून तिच्याशीं हेवादावा मांडला. मुख्य कारभारी सखारामबापू याला वळवून गोपिकाबाईशीं तिनें खूप भांडण केलें; तेव्हां ती बिचारी परत गंगापूरलाजी गेली ती पुन्हां म्हणून पुण्याला आली नाहीं! दादा सर्वस्वीं बायकोच्या आधीन झाला आहे, पूर्वीसारखा आपला मान ठेवीत नाहीं, हें शल्य तिला सारखें बोचीत राहिलें; नारायणाबद्दल काळजी वाटूं लागली. पण ईश्वरावर सर्व भरवंसा टाकून ती बाजूला राहिली.

नारायणराव आतां पेशवा झाला, आतां आपली पाळी कधीं येणार नाहीं व आपल्याला पेशव्याच्या ताब्यांतच शेवट-पर्यंत राहावें लागणार, अशा विचारांनीं दादा पुन्हां अस्वस्थ झाला. आनंदीबाईची मोठी महत्त्वाकांक्षा म्हणजे मराठे साम्राज्याचीं सूत्रें आपण दादासाहेबातर्फें हालवावयाचीं, ती जागच्या जागीं जिरूं लागली. इकडे नारायणराव सखारामबापूचा सल्ला ऐकत नसे, त्याचा पाणउतारा करी; यामुळें तोहि असंतुष्ट होता. तेव्हां या त्रिकुटानें नारायणरावाविरुद्ध बाहेरचे शत्रु आणि घरचे सरदार उठविण्याचीं कारस्थानें सुरू केलीं. नारायणरावाला ही बातमी लागल्यावर त्यानें यांच्यावर कडक पाहारे बसविले. तों हे जास्तच चेकाळले.

या वेळीं राघोबाची मुलगी दुर्गाबाई हिचें लग्न बारामतीचे बाबूजी नाईक जोशी सावकार यांच्या मुलाशीं जमलें. नारायणरावानें लग्न फार थाटानें केलें. चुलताचुलतीच्या मताप्रमाणें सोयऱ्यांना आहेरबहुमान दिले. कांहीं कमी पडूं दिलें नाहीं. लहानपणापासूनच त्याचें प्रेम काकाकाकूंवर होतें. त्याची मुंज आणि लग्न दादानेंच लाविलीं होतीं. पण आतां त्यांचा उघडा नागडा स्वार्थ पाहून तो नाइलाजानें कठोर वागे.

एकदां नारायणराव गंगापुरास आईला भेटण्यासाठीं गेला असतां दादानें शनवारवाड्यांतून पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण तो फसला. तेव्हां यामागील कट उघडकीस येऊन दादावर जास्त पहारा बसला. या वेळीं पुण्यांत दादाच्या बाजूनें दोन तीन कट करण्यांत आले होते. दादाला पळवून फौज जमवून पुण्यावर स्वारी करण्याचा एक; नारायणरावास कैदेंत टाकून दादास गादीवर बसविण्याचा दुसरा— या कटांत सखारामबापू, भवानराव प्रतिनिधि इ० मोठी मंडळी होती; व तिसरा नारायणरावावर मारेकरी घालण्याचा— या कटांत आनंदीबाई सामील होती म्हणतात, बापू किंवा दादा यांना याची माहिती नव्हती, असें दिसतें. एकमेकाला कैद करण्याचे किंवा मारेकरी घालण्याचे प्रयत्न मागेंहि झालेच होते. खुद्द सदाशिवराव भाऊवर मारेकरी घालण्यांत आले होते. दादानें माधवरावास व माधवरावानें दादास कैद केलेंच

होतें. तेव्हां या गोष्टींची क्षिति फारशी कोणास वाटली नाहीं.

शनवारवाड्यावर पाहारेकरी गाडदी होते. त्यांचे तीन जमादार सुमेरसिंग, खरकसिंग व महंमद इसफ असे होते. या जमादारांची मदत कटवाल्यांनीं घेतली. त्यांना तीन किल्ले आणि पांच लाख रुपयांची लांच देऊं केली. नारायणरावास 'धरावें' असा स्वदस्तुरचा हुकूम दादानें गाडद्यांच्या हवालीं केला. या हुकुमांतल्या 'धरावें' शब्दांतील पहिलें अक्षर जें 'ध' त्याबद्दल 'मा' (मारावें) कोणीं केला हें अद्याप गूढच आहे. त्या वेळच्या मंडळींची समजूत, आनंदीबाईचेंच हें कृत्य असावें, अशी बनली होती. तिच्याच अनुरोधानें बखरकार आणि पोवाडेकार व इतर सर्व लेखक आनंदीबाईलाच कृत्या ठरवितात. स्वतः आनंदीबाईला, लोक आपल्यावर हा आरोप करतात याची जाणीव होती. त्याचा निषेध करून ती म्हणत असे, "नारायणराव यास दगा जाला हेहि आम्हास ठाऊक नाहीं. याविसीं आमचे आंगीं लावणारानें लावावें." "माझा दस्तऐवज किंवा निरोप कांहीं तरी निवडावयाचें होतें." मरण्यापूर्वीं दादानें जें प्रायश्चित्त घेतलें त्या वेळीं "रायास धरावें असा निश्चय राजकारण करणाराशीं केला ते समयीं त्यांनीं विचारिलें, न जाणों, धरूं जातां कलागत घडली आणि त्यांत मारले गेले तर दोष ठेऊं नये, असें सोडवून घेऊन ते कर्मास प्रवर्तले....

तेव्हां धरण्याचे संकल्पांत कलागतीं पडून मारला गेला" असा उच्चार केला आहे. त्यावरून नारायणरावास मारण्याचा बेत पूर्वीं नव्हता, पण ऐनप्रसंगीं तशी सहजगत्या गोष्ट घडली.

राघोबादादाचा गाड्यांना दिलेला अस्सल हुकूम न्यायाधीश रामशास्त्री यांच्या हातीं जो पुढें आला त्यांत 'ध'चा 'मा' केलेला होता. तेव्हां 'ध'चा 'मा' कोणीं केला हें गूढ अद्याप उलगडलें नाहीं. राज्य गेल्यावर ब्रह्मावर्तीं असतांना शेवटचा बाजीराव असें बोलल्याचें सांगतात कीं, "मातोश्रींचें ऐकून दादांनीं त्या पोराला (नारायणास) मारविलें. हें राज्य आम्हांस मिळावें म्हणून. परंतु राज्यांतीं नर्क आहे म्हणून मीं हें सोडलें व एकदांचा मोकळा झालों!"

# ६

## सात महिन्यांची पेशवाई

'ध'चा 'मा' कोणीं केला कीं न केला तरी नारायणराव मोठ्या क्रूरतेनें मारला गेला यांत शंका नाहीं. एका बखरींत या प्रसंगाचें हृदयद्रावक वर्णन दिलें आहे :

"सुमेरसिंग गाडदी व खरकसिंग गाडदी हे उभयतां पांच हजार गाडद्यांचे जमातदार; त्यांस सांगितलें जे, श्रीमंत नारायणरावसाहेब यांस तुम्हीं धरावें; म्हणजे तुम्हांस बक्षीस गांव इनाम वगैरे मिळतील. त्यांनीं उत्तर केलें कीं, आम्हांस दस्तऐवज करून दिला तर आम्ही हा उद्योग करूं. असें म्हणतांच श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब यांनीं दस्तऐवज करून दिला जे, नारायणराव यांस धरावें, नंतर तुम्हांस अमुक बक्षीस देऊं. असें नानाप्रकारें लिहून दिलें. तों आनंदीबाई, रघुनाथरावदादा यांची पत्नी, तिनें गाडद्यांस बोलावून सांगितलें जे, तुम्हांस धरावें असें लिहून दिलें; त्यास धरिलें असतां पुढें कांहीं लोक तिकडे, कांहीं इकडे असें होऊन

राजकारण उभें राहील. त्यास मारून टाकावें हेंच बरें, म्हणजे एकछत्री जाहलें ! असेंच करावें. नंतर गाडदी यांनीं उत्तर केलें कीं, आपण 'धरावें' असें लिहून दिलें आणि मारावें कसें ? तेव्हां आनंदीबाईनीं सांगितलें कीं, तुम्हांस मारावें असें लिहून देतें. तुमचा कागद कोठें आहे तो आणावावा. नंतर त्यांनीं कागद आणून दिला; तेथें 'धरावा' जें होतें तें तेथेंच 'मारावा' असें करून दिलें. 'ध'चा 'मा' केला. नंतर सारा मजकूर ठीक होता."

'ध'बद्दल 'मा' येण्याचें असें कारण देऊन बखरकारानें प्रत्यक्ष वधाचा प्रसंग कसा रंगविला आहे तो पाहा :

"जे दिवशीं मारावयाचें, तेच दिवशीं श्रीमंत गांवांतच पुणें मुक्कामीं सासुरवाडी होती तेथें भोजनास सहकुटुंब गेले होते. इकडे वाड्यांत नाकेबंदी होऊन तलब (पगारबाकी) चढली म्हणोन गाडदी जमा जाहले. श्रीमंत सासुरवाडीस भोजन करून विडे घेतात तों कोणीं सूचना केली कीं, आपण वाड्यांत जाऊं नये. कांहीं दंगा फितूर आहे, त्यास कृपा करून वाड्यांत जावयाचें करूं नये. तेव्हां त्याजवर रागें भरले आणि तसेच पालखींत बसोन वाड्यांत आले. आणि तिसरे मजल्यावर खबूतरखाना होता तेथें अम्मल उभे राहिले. तों उभयतां गाडदी तेथें आले आणि विनंति केली कीं, महाराज ! आमची तलब चढली याची वाट काय ? आमचा

रोजमुरा फडशा करून द्यावा. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, तिसरे प्रहरीं कचेरीस विनंति करावी. नंतर काय जी आज्ञा व्हावयाची ती होईल. गाडदी यांनीं उत्तर केलें कीं, आम्हांस कचेरीची काय गरज? आपण धनी. आपण फडशा करावा. तों श्रीमंत तेथून खालीं येऊं लागले. तों जिना उतरतांनाच गाडदी यांनीं लगट केली कीं, आम्हांस येथें ऐवज द्यावा, नाहींपेक्षां आम्ही उतरूं देणार नाहीं. तों इच्छारामपंत ढेरे म्हणून कारकून होते ते गाडद्यांस रागें भरले जे, असा दंगा केल्यानें ऐवज मिळतो कीं काय! असें उचलून बोलतांच त्यांनीं तलवारी ओढून इच्छारामपंतास ठार मारिलें. तों श्रीमंत जिना उतरून खालीं आले. तों खालीं चौकांत पूजेच्या गाई दोन बांधिल्या होत्या त्या गारद्यांच्या नागव्या तलवारी पाहून बुजाल्या आणि दावीं तोडून गारद्यांच्या अंगावर आल्या. तों तेथें फुरसद सांपडली. नाहीं तर तेथेंच श्रीमंतांस मारावें असें होतें. गाई आडव्या येतांच गाडद्यांनीं तलवारीनें गाई ठार मारिल्या! तों श्रीमंत पार्वतीबाईचे खोलींत गेले, आणि सांगितलें कीं, काकी, मला गाडदी मारतात! तेव्हां पार्वतीबाई बोलली कीं, मी तुला लपवितें. तूं कांहीं भिऊं नको. आणि तुला मी पारही करितें. असें म्हणाली. तों श्रीमंतांनीं उत्तर केलें कीं, मी दादासाहेब यांजकडे जातों. असें म्हणून तेथून निघाले. तों गाडदी यांनीं गांठिलें तों तेथें कुणबीण

होती ती आडवी जाहली. तिलाही ठार केली. गारद्यांस खून चढला. तों दादासाहेबांजवळ श्रीमंत जाऊन कमरेस मिठी घालून बोलले कीं मला मारूं नका. किल्ल्यावर कैद करून पीठमीठ लावून ठेवा! मारूं नका! असें दीनवचन बोलले तेव्हां दादासाहेबांस दया आली. तों गाडदीही तेथें आले आणि बोलले कीं, आतां आम्ही यास जिवंत सोडणार नाहीं. हा वांचल्यास आमचीं रांडापोरें ढाकणास वांटील! सर्पास दुखवून सोडितों कीं काय? असें म्हणतांच दादासाहेब म्हणाले कीं, अरे, बाळास मारूं नका! असें म्हणून हात पुढें केला. तों आंत खोलींत तेथेच आनंदीबाई होती तेथून दादासाहेब यांस म्हणाली कीं, 'आतां झांकणें हातांत घाला!' असें म्हणून गाड्यांस सांगितलें कीं, उभयतांस मारून टाका!! तों गाड्यांनीं एक वार टाकिला तो दादासाहेब यांचे हातास लागला. तों तुळ्या पवार आनंदीबाईचा खिसमतगार होता त्यानें श्रीमंतांचे पायास धरून दादासाहेब याचे कमरेपासून ओढिलें. तों चाफाजी टिळेकर श्रीमंत माधवरावसाहेब यांचा खिसमतगार तसाच श्रीमंतांवर पडला. तों गाडदी यांची तलवार चालली. तेथें कांहीं बाकी राहिली नाहीं! उभयतांचे तुकडे एके टिकाणीं जाहले. श्रीमंत साखरभात भोजन करून गेले तो पोटांतून तसाच पडला! हें कृत्य रघुनाथरावदादा यांचेसमोर जाहलें."

बखरींतील सर्वच गोष्टी खऱ्या नसतात, तेव्हां आनंदीबाईसंबंधीं वर जें सांगितलें आहे तें अगदीं खरें धरून चालतां येणार नाहीं. मात्र बाईची वृत्ति जी दिसून येते ती खोटी नसेल. सारखी पुतण्याची कैद आणि इतरांचा जाच! याला कंटाळून तिनें आणि दादानें नारायणरावाचा सूड उगविण्याचें मनांत आणलें असलें तर त्यांत वावगें काय झालें? खुनापावेतों पुढें मजल आपोआपच गेली. नारायणराव आणि त्याचे कारभारी यांचाहि यांत थोडाफार दोष आहेच. तेहि गैरसावधपणें वागले. असो. दादासाहेबांच्या पक्षाकडील मुत्सद्यांना सुद्धां पेशव्याचा खून पाहून दादाविषयीं एकदम तिटकारा आला. सखारामबापू वेडयासारखा झाला व गांवांत भटकूं लागला. भवानराव प्रतिनिधीनें तर चक्क राघोबाच्या तोंडावर सांगितलें कीं, 'फार लौकिक मिळविला!' त्रिंबकराव मामा तर बोलून चालून विरुद्ध पक्षाचे. नारायणरावाच्या देहाचे तुकडे पाहून पेठे बेभान झाले व दादाच्या तोंडापुढें हात नेऊन म्हणाले, "श्रीमंत बाजीरावसाहेब यांचे पोटीं पोरगी जन्मास आला असतात तर एक्या ब्राह्मणाचें घर उभें राहतें! हें काय केलेंस!!" मामांना असें बोलण्याचा अधिकारहि होता. ते बाजीरावापासून कारभारांत वागत होते. पेशव्यांचे मुख्य न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांच्याकडे दादासाहेबाला प्रायश्चित्त देण्यासाठीं बोलाविणें गेलें असतां, मुलेंमाणसें घरीं

माहुलीस पाठवून हातांत पळीपंचपात्री घेऊन ते वाडयांत आले व "देहान्त प्रायश्चित्ताशिवाय या हत्येला दुसरें प्रायश्चित्तच शास्त्रांत नाहीं" असें निर्भीडपणें बजावून माहुलीस निघून गेले. झालें! दादा-आनंदीबाईला कोठून हा राज्य घेण्याचा उपद्व्याप केला असें झालें. दादानें सर्व सरदारांना विनंति केली कीं, झाली गोष्ट येत नाहीं. आतां आमची शहरांत द्वाही फिरवून बंदोबस्त करावा. नारायणरावाची बायको गंगाबाई सती जाण्यास निघाली होती पण गरोदर म्हणून आनंदीबाईनेंच तिला जाऊं दिलें नाहीं व खोलींत कोंडून ठेविलें. तिळांजळीसाठीं सर्व सरदार दहाव्या दिवशीं ओंकारेश्वरच्या वाळवंटांत जमले असतां सखारामबापू, नाना फडणीस, हरिपंत फडके आणि त्र्यंबकमामा पेठे यांनीं एकत्र बसून खलबत केलें व वाळूचें शिवलिंग करून शपथा वाहिल्या कीं, नानासाहेबांचा वंश चालवायाचा. त्या वंशा-शिवाय कारभार चालावयाचा नाहीं. या वंशास (राघोबाच्या) नमस्कार करावयाचा नाहीं. हेंच बारभाईचें कारस्थान!

उत्तरक्रिया उरकल्यानंतर वस्त्रें आणण्यासाठीं दादानें सातार्‍यास कारकून पाठविला, स्वतः गेला नाहीं. याप्रमाणें दादासाहेबानें शेवटीं एकदां पेशवाईचीं वस्त्रें अंगावर घातलीं व आनंदीबाईच्या डोळ्यांचें पारणें फेडलें. पण हें वैभव फार दिवस टिकावयाचें नव्हतें.

## ७

# राघोबाचा पळ आणि आनंदीबाईचा वनवास

पेशव्यांच्या घरांत रक्तपातापर्यंत मोठा कलह माजला आहे असें पाहून निजामानें पेशव्यांचीं मोंगलाईंतील ठाणीं घेतलीं व तो पुण्याच्या रोखानें निघाला. हें कळतांच दादासाहेबानें सर्व कारभाऱ्यांसह त्याच्यावर स्वारी केली. बेदर येथें निजामअल्लीशीं लढाई व तह केल्यावर दादा कर्नाटकांत उतरला. इकडे बापू, नाना, फडके वगैरे सर्व कारभारी कांहीं निमित्त करून स्वारी सोडून पुण्यास आले. नारायणरावाची बायको गंगाबाई गरोदर होती; तेव्हां तिच्या संरक्षणाची मोठी काळजी त्यांना होती. आनंदीबाईनें तिच्यावर मारेकरी घातल्याचा संशय त्यांना होताच. तेव्हां त्यांनीं मोठ्या युक्तीनें गंगाबाई, पार्वतीबाई, सगुणाबाई आणि दुर्गाबाई (दादाची मुलगी) या खाशांना पुरंदरावर बंदोबस्तांत ठेविलें व पुण्यास स्वतःची फौज जमविण्याचा उद्योग चालविला. त्यांनीं रघुनाथराव पेशव्यास

बंडखोर ठरवून गंगाबाईच्या नांवानें पुरंदरावरून कारभार सुरू केला. दादासाहेबाचा पक्ष कोणीं न घेण्याचा हुकूम बारभाईंनीं सर्व सरदारांकडे पाठविला व खुद्द दादाच्या सैन्यांत फितुरी आरंभिली. पुष्कळांनीं त्याच्या सैन्यांतून पाय काढून बारभाईंकडे ते आले. अर्थात् बारभाईंची फौज वाढली व ती दादाच्या पाठीमागें लागली.

दादा आणि बारभाई यांची पहिलीच लढाई पंढरपुराजवळ कासेगांव येथें झाली. या लढाईंत त्रिंबकराव मामांच्या उतावळि स्वभावामुळें ते धरले गेले. कैदेंत असतांना आनंदीबाईनें त्यांचे फार हाल केले. ती त्यांस नेहमीं आपल्या डोळ्यांसमोर फटके मारवी व "आतां कसें ? मेले चालले मसलती करून राज्यांत बखेडे घालायला !" असें टोंचून बोले. तिचा स्वभाव रागीट व खुनशी झाला होता व त्याला कारणहि होतें. इतका भगीरथ प्रयत्न करून, पुतण्याच्या खुनापर्यंत पाळी आणून, मिळविलेली गादी हे हाताखालचे 'फितुरी' नोकर काढून घेऊं पहातात, याचा तिला संताप येणें अगदीं स्वाभाविक होतें. असो.

मामांचा पराभव झाला तरी हरिपंत फडके मागें होताच. त्यानें भोसले आणि निजाम यांना आपल्याकडे वळवून दादासाहेबाला शह दिला. तेव्हां दादा उत्तरेकडे नर्मदा उतरून इंदुरकडे पळाला. तेथें होळकराची मदत मिळवून

त्यानें शिंद्यांशीं बोलणें लाविलें. इकडे पुरंदरास गंगाबाई प्रसूत होऊन बारभाईंच्या नशीबानें तिला पुत्र झाला (१८ एप्रिल १७७४). राघोबाचा गादीवरील हक्क आतां तर अजिबात नाहींसा झाला. वयाच्या ४० व्या दिवशीं या बालपेशव्याला वस्त्रें मिळालीं व त्याच्या नांवानें हिंदुस्थानांत सर्वत्र द्वाही फिरली.

इंदुरास शिंदे-होळकरांनीं राघोबा आणि पुण्याचे कारभारी यांमध्यें समेट घडवून आणण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. ते राघोबाच्या हाताखालीं बरींच वर्षें वागलेले; तेव्हां त्यांना जुन्या यजमानांना सोडतां येईना कीं नवीन पेशव्यांशीं द्रोह करतां येईना. दादा आणि नानाबापू यांनीं एकत्र येऊन बोलणें करावें असा घाट त्यांनीं घालून दादाला परत फिरविलें. दादा नर्मदा उतरून खानदेशांत आला व नानाबापू पुण्याहून औरंगाबादेस आले. पण दादास आपल्याला शिंदे-होळकर बारभाईंच्या हवालीं करतील असा संशय येऊन तो पुन्हां वर माळव्यांत पळाला. दादाचा हाच संशयी अधीरा स्वभाव त्याला शेवटपर्यंत नडला व त्याच्या पक्षाच्या मंडळीलाहि भोंवला. आनंदीबाई पदोपदीं याबद्दल नांवें ठेवी पण तिचेंहि तो फारकरून या वेळीं ऐकत नसे. ती या वेळीं बाळंतपणास टेंकली होती; तेव्हां दादाच्या पळांत तिला यापुढें भाग घेणें अशक्य होतें. यामुळें दादानें तिला धार

येथें किल्ल्यांत ठेविली व तिची व्यवस्था करून आपण गुजराथकडे वळला. बरोबर दत्तक पुत्र अमृतराव होता.

धारचा खंडेराव पवार दादाच्या बाजूच्या असल्यानें त्यानें आपल्या दिवाणाच्या मनाविरुद्ध जाऊनहि आनंदीबाईला थारा दिला. ती धारला आतां सुखांत होती. तिचा वनवास थोडे दिवस तरी सरला म्हटलें पाहिजे. याच किल्ल्यांत ती बाळंत होऊन तिला मुलगा झाला (७ जानेवारी १७७५). हाच शेवटचा पेशवा, दुसरा बाजीराव. जन्मापूर्वी व नंतर बरींच वर्षे याचे आईबाप पळत सुटले होते म्हणूनच कीं काय हाहि पुढें पळपुटा निघाला ! वडिलांप्रमाणें यालाहि लहानपणापासूनच वाईट व्यसनें लागलीं. पण तो पुढचा इतिहास !

इकडे शिंदे-होळकरांचें न ऐकतां इंग्रजांच्या मदतीची आशा धरून दादा खंबायतला गेला. मागें बारभाईंची फौज लागली होतीच. खंबायत येथें थारा मिळेना म्हणून कसातरी भावनगर, धंदुका या मार्गानें पायींच घोघो बंदरीं दाखल झाला. वाटेंत कोण हाल ! बरोबर शागीर्द, शिष्य, दासी वगैरे आश्रितांचा मोठा तांडा. या वेळीं इंग्रजांनीं मदत दिली नसती तर हरिपंत फडक्याच्या हातीं सांपडून कैदी म्हणून पुण्याला रवानगी झाली असती. इंग्रजांना मराठ्यांच्या घरांत शिरून हळू हळू आपला मोठा फायदा करून घ्यावयाचाच

होता. साष्टी व वसई त्यांना आधीं पाहिजे होतीं. आयता एक मोठा पेशवा घरीं चालून आला. मग काय पाहिजे ! त्यांनीं राघोबाला आपल्या जहाजांतून ऐषआरामानें सुरतेस आणिलें व तह करून घेतला. इंग्रजांनीं दादास पेशवाई परत मिळवून देण्यासाठीं जी फौजेची मदत करावयाची तिच्या खर्चाबद्दल दादानें दरमहा दीड लाख रुपये व आगाऊ सहा लाख रुपये द्यावयाचे होते. तेव्हां दादानें जवळचें सर्व जवाहीर त्यांच्याकडे गहाण ठेविलें !

धार येथें आनंदीबाई स्वस्थ बसली नव्हती. नवऱ्याच्या सर्व हालचालींवर तिचें बारीक लक्ष असे व ती त्याच्याकडील विश्वासू माणसांना पत्रें पाठवून मसलती लिही. आपल्या पक्षास मातबर सरदारांना ओढण्यासाठीं ती खटपटहि करी. इकडे बारभाईंच्या मंडळींना सुद्धां गोडीगुलाबीनें लिहीत असे. "पुरंदरची सर्द हवा लेंकरास मानवणार नाहीं" असें बाल सवाईमाधवरावाबद्दल माया दाखवून तिनें एका पत्रांत नाना फडणिसास लिहिलें आहे. त्यापूर्वीं एकदां आपल्या-मुळावर आलेल्या या नारायणरावाच्या मुलाविषयींच ती नानाबापूस सवाल टाकते, "चिरंजीव नारायणराव यांस पुत्र जाहल्याचें वर्तमान तिकडे हुजूर ल्याहावें आणि आम्हांस न ल्याहावें, असा तुमचा आमचा ऋणानुबंध नाहीं. तुम्हां-कडूनही नसेल, असें आम्हांस वाटतें." लाघवी भाषा लिहि-

ण्यांत बाई पटाईत होती; तसेंच ती चांगले टोमणेहि देत असे.

मराठ्यांशीं युद्धाचा प्रसंग वरिष्ठ इंग्रज सरकारला या वेळीं नको होता व पेशव्यांनाहि हैदर वगैरे शत्रूंशीं तोंड द्याव-याचें असल्यानें आणि राज्यांत अंदाधुंदी माजली होती ती मोडावयाची असल्यानें, जवळच्या इंग्रजांशीं सामना टाळतां आल्यास पाहिजेच होता. तेव्हां पुरंदरचा तह १७७६ त करण्यांत आला व इंग्रजांनीं उघडपणें दादाचा पक्ष सोडला व दरसाल तीन लक्ष पंधरा हजार नेमणूक घेऊन गंगातीरीं राहाण्यास दादास सांगण्यांत आलें. पण दादा सुरत सोड-ण्यास कबूल झाला नाहीं व इंग्रजांनींहि त्याला तेथून घालवून देण्याची टाळाटाळी चालविली.

मध्यंतरीं आनंदीबाई बाजीरावास घेऊन दादाच्या भेटीस सुरतेस गेली होती; पण हा तह झाल्यानंतर परत धारला गेली व तेथें स्वतःची फौज ठेवून भोंवतालच्या महालांतून तिनें दंगे आरंभिले. तेव्हां बारभाईतर्फे धारचा दिवाण ओढेकर यानें ते दंगे मोडून बाईला पकडण्यासाठीं धारच्या किल्ल्याला वेढा दिला. बाईनें चारपांच महिने किल्ला लढ-विला. दादाला ही गोष्ट कळून, इंग्रज आणि शिंदे यांना मध्यस्थी घालून बायकोमुलाला त्रास होऊं न देण्याविषयीं त्यानें खटपट केली. बाईनेंहि आंतून बोलणें लावलें कीं, 'आम्हांस अहल्याबाईजवळ किंवा पुण्यास पोंचवावें.' बाईस

पुण्याकडे ठेवल्यास बालपेशव्यास ती अपाय करील या भीतीनें कारभाऱ्यांनीं तिला मंडलेश्वरास बंदोबस्तांत ठेविलें. अहल्याबाई होळकर येथून १२ मैलांवरच महेश्वरास होती.

इकडे दादाचीं कारस्थानें चालूच होतीं. तो पोर्तुगीजांशीं बोलणें करण्याकरितां दमणला गेला पण कांहीं फलप्राप्ति न झाल्यामुळें तारापुरावरून मुंबईस आला. या ठिकाणीं मात्र तो दोन वर्षें टिकला. तोतयाप्रमाणें आपल्याला पकडून कारभारी कैदेंत टाकतील या भीतीनें तो बाहेर पडला नाहीं. मुंबईस स्वतंत्र वाडा बांधून अनुष्ठानें, नमस्कार, नवस इ. करीत राहिला. इंग्रज त्याला खर्चास दरमहा पंधरा हजार रुपये देत असत. या अवधींत दादाचें पुण्याचें कारस्थान चांगलें रंगलें. दादाच्या पक्षाचा मोरबा फडणीस (नानाचा चुलतभाऊ) यानें पुण्यास दादाला आणून आपण कारभारी होण्याचा कट केला. या कटांत सखारामबापू सुद्धां मोठमोठे लोक होते. नाना फडणिसास कैद करून कारभार आपल्या हातीं घेण्याच्या प्रयत्नांत नानाचा हा चुलतभाऊ मोरबा होता. तेव्हां नानानें त्याला वळवून दौलतीचा कारभार त्याच्याकडे दिला व आपण पुरंदरावर बालपेशव्यास घेऊन राहिला. व पुढें हळू हळू एक एक मातबर सरदार मोरबाच्या पक्षांतून फोडून शेवटीं मोरबाला कैद केला व नंतर तळेगांवीं इंग्रजांचा मोड करून आल्यावर बापूसहि फितुरीबद्दल कैदेंत टाकिला.

याप्रमाणें दादाला पुन्हां गादीवर बसविण्यासाठीं झालेले कोणतेच कट यशस्वी झाले नाहींत.

मंडलेश्वराहून आनंदीबाईनें मोठया शहाणपणानें व दूर-दृष्टीनें कारभाऱ्यांशीं पत्रव्यवहाराचा सलोखा ठेविलाच होता. दौलतीच्या कल्याणावर नजर देऊन तरी त्यांनीं याउपर आपल्याशीं समेट करावा, अशा अर्थाचीं पत्रें लिहून त्यांचीं मनें वळविण्याचा ती प्रयत्न करीतच होती. सखारामबापूस लिहिलेलें पुढील पत्र फार मार्मिक आणि कळकळीचें असून त्यावरून बाईच्या स्वभावाची चांगली माहिती होते. या पत्राची तारीख २५-९-१७७८ आहे.

"बुंदेलखंडांत इंग्रजांचे दोन कंपू आले आहेत. हूजूरचीं (दादाचीं) पत्रें जाऊन हे इंग्रज आले. जबरदस्त आहेत. त्यांचें यांस बोलणें कीं आपणांस दौलतीवर बसविणें, आम्हांस राहण्यास जवळ जागा द्या, व दहा हजारपर्यंत आमची फौज ठेवा. हीं गोष्ट हुजुरांस कठीण वाटली. परंतु रानोमाळ हिंडावें, त्यापेक्षां त्यांहीं श्रमें करून कबूल केलें. असे इंग्रज घरांत येऊं पाहतात. तमाम अंमल आपले बस-वितात. आम्हीं निमित्तमात्र, पण तेच दौलतेस गिऱ्हाईक होतात. लखनौचे शुजाउद्दौले व अर्काटचे महंमद अली यांच्या घरांत प्रथम हे इंग्रज नम्रतेनें पायरव करून आतां उभय-तांस पोटापुरतें देऊन आपण धनी झाले, तसेंच आमच्या

घरांत होईल. सर्व गोष्टी तुम्हांस ठाऊक असोन हल्लीं या तऱ्हा दिसतात. हुजूरची मर्जी कोण्या तऱ्हेनें समजाविल्यानें नीट राहते, कोण्या तऱ्हेनें बिघडते, यास तुम्ही माहीत आहां. काळच विपरीत आले. परंतु आम्हांस हाच भरंवसा आहे कीं, तुम्ही कालचक्रासही फिरवाल. म्हणून तुम्हांस पत्र लिहिलें आहे. तरी ब्राह्मणी दौलत नीट राहून, हुजूरचाही संतोष राहून बऱ्या होतील त्या गोष्टी कराव्या, नाहीं तर जन्मभर चांगलें केलें आणि म्हातारपणीं इंग्रजांच्या घरांत ब्राह्मणी दौलत घातली, हें अपेश येई तो अर्थ न करावा. हुजूर ऐकत नाहींत असें म्हणाल, तर त्यांचे तुम्ही प्राण घेतां किंवा पेचांत आणतां, त्यापक्षीं काय होईल तें हो, तुमचे हातीं नच लागावें हा निश्चय आहे. कोणासही पेंच सोसत नाहीं. विशेष लिहावें तरी तुमचे दशांशही आम्हांस समजत नाहीं. यशापयशाचे धनी तुम्ही. आम्ही लिहून विशेष तों नाहीं. तुम्ही मोजीतही नाहीं. परंतु अंदाज दिसत चालला यास्तव सूचना लिहिली आहे."

प्रत्येकाच्या हेतूची पारख करून मोठेपणानें व त्याबरोबरच विनयानें हें पत्र बापूस, जास्त जिव्हाळ्याचा व आपल्या बाजूचा हितकर्ता म्हणून मुद्दाम लिहिलें आहे. याच दिवशीं नानास लिहिलेल्या पत्रांत, "तुम्ही तीन पिढ्यांचे दौलतेंतील फडणीस असोन हल्लीं यवनाक्रांत ब्राह्मणी दौलत

फितुरांनीं होऊं पहाते. तुमच्या चित्तांतील उगीच आटी जात नाहीं. याचा बारिक मोठा विचार तुम्हींच करणें. आम्ही येथें तुमच्या स्वाधीन. पावणेदोन वर्षें जालीं. तुमची कार्यसिद्धि कांहींच न जाली. तुमची फौज गुंतून, आमच्या धन्याचे पायाशीं वियोग, हें उभयपक्षीं नुकसान. आम्हास मुंबईस पोंचविणें.–" असा वरील आशयाचा मजकूरच पण माणूस पाहून निराळ्या शब्दांत लिहिलेला आढळेल. आनंदीबाईचें लिहिणें नेहमीं मोठें व्यावहारिक आणि मोठ्या मुत्सद्याला शोभेल असेंच असे. तिचीं पत्रें व तिनें वेळोवेळीं काढलेले उद्गार हीं मननीय आहेत. या पुस्तकाच्या शेवटीं तिचे अनुभवाचे बोल जे दिलेले आहेत त्यांवरून तिची योग्यता कळून येते.

## ८

# शेवटचा आधारहि तुटला

पुरंदरचा तह इंग्रजांनीं धाब्यावर बसवून दादासाहेबास अद्याप सुरतेस आश्रय दिला आहे, याची नाना फडणिसास साहाजिक चीड येऊन त्यानें इंग्रजांविरुद्ध फ्रेंच सरकारशीं बोलणें सुरू केलें. तेव्हां मात्रा लागू पडली व इंग्रज दादास घेऊन पेशव्यांच्या मुलुखावर तळेगांवापर्यंत चालून गेले. पण तळेगांवीं त्यांचा पराभव होऊन नामोष्की पत्करावी लागली. दादास त्यांनीं शिंद्यांच्या स्वाधीन केला. शिंद्यांच्या गोटांत असतांनाच दादानें तळेगांवीं अमृतरावाचें दुसरें लग्न करून दिलें व नंतर झांशीस परिवारासह राहण्यास तो कबूल झाला. त्याप्रमाणें शिंदेहोळकरांच्या बंदोबस्तांत दादा झांशीकडे म्हणून चालूं लागला. ब्र्हाणपुरास आनंदीबाई येऊन मिळाली; व आतां सर्व ठीक होणार, असें सर्वांना वाटणें स्वाभाविक होतें. पण दादा पूर्वीपासून कपटबुद्धि व चंचल. त्यानें शिंद्यांच्या फौजेवर बेसावध असतां चाल करून तिच्या तावडींतून जों निस-

टला तों पश्चिमखानदेशांतून गुजराथेंत धांवत गेला व इंग्रजांचें साहाय्य मिळवून पुन्हा सुरतेंत येऊन तळ ठोकला ! या वेळीं फत्तेसिंग गायकवाडाचीहि त्याला चांगली मदत होती व कलकत्त्याहून इंग्रजांचा प्रख्यात सेनापति कर्नल गॉडर्ड यानें दादाची बाजू परत उचलून, तळेगांवीं इंग्रजांच्या कीर्तीला लागलेला कलंक धुवून काढण्याचा चंग बांधला होता; यामुळें दादाला पुन्हां जोर चढला पण ही त्याची जुनी नानासाहेबांच्या कारकीर्दींतील वीरश्री नव्हती. अटकेवर मराठ्यांचा झेंडा लावणारा राघोभरारी केव्हांच खलास झाला. इंग्रजांनाहि त्याचा भागूबाईपणा चांगलाच दिसून आला होता. तो आपलें भाग्य इंग्रजांच्या हातीं देऊन सुरतेस आणखी चार वर्षें राहिला. आनंदीबाईला नवऱ्याच्या या वर्तनाचा राग येत नव्हता असें नाहीं. तिनें यापूर्वीच अप्रत्यक्षपणें त्याला पुष्कळ सांगून पाहिलें होतें. तिनें दादाच्या कारभाऱ्यास लहानग्या बाजीरावाच्या नांवें तिळगूळ पाठवितांना जें पत्र लिहविलें त्यांत पुढील उपदेशाचा मजकूर किती हळुवार व कळवळ्यानें लिहिला आहे तो पाहा :

"चवघे जे गोष्टीनें आपल्या मनांत येतील त्या तऱ्हेचीं सूत्रें राखावीं व आपले दौलतेंत कोणी मोठें माणूस असेल त्यांणीं कराराचा शब्द मागितला तर त्यास देऊन कार्य होते ते गोष्ट करावी. नाहींतर सल्ला तरी कालावर नदर देऊन

करावा. ह्या गोष्टींतून कांहींच नजरेस येत नाहीं; आणि **उगेच इंग्रजांचे घरीं पोटास मात्र खाऊन कितीक दिवस पडोन राहावें?** यांत पूर्वींपासून तेज मिळविलें आहे. या प्रांतांत पराक्रमाच्या गोष्टी तीर्थरूपांच्या फार ऐकतों, त्या अशा कीं ज्या तऱ्हेनें पुराणांतील गोष्टी ऐकाव्या त्या तऱ्हेच्या. असें असोन हें तेथें राहणें आणि उद्योग न करणें, हें काय समजून वडिलांचे मर्जीस येत असेल? वरकड जातीनें तो बहूत मानी आहेत. परंतु कालापुढें इलाज नाहीं. आम्ही लेंकरें, विशेष लिहिलें तर तीर्थरूप म्हणतील कीं, 'बाइको सारा वेळ आम्हांस गांजीत असते. तिला लेक झाला तोही तसाच खोटा निघाला!' यास्तव तुम्ही मर्जी पाहून पत्र वाचून दाखविणें आणि आज्ञा जे होईल ते लिहिणें." बाईची परिस्थिति किती कठीण व नाजूक होती तें दिसून येतें. नवरा असा, आपण बोललों तर जास्त फिसकटावयाचा; तेव्हां चार वर्षांच्या मुलाच्या नांवानें त्याच्या दिवाणजीस हें पत्र तिनें पाठविलें, व परस्पर कानपिचक्या दिल्या!

इकडे इंग्रजांनीं गायकवाडास वश करून घेतला; होळकरास स्वस्थ, तटस्थ बसविला व निजामास लांच कबूल केली. तेव्हां नानानेंहि हैदर आणि फ्रेंच यांच्या मदतीनें इंग्रजांना सर्वत्र शह देण्याची तयारी केली. तेव्हां कोठें इंग्रज तहाला कबूल झाले व शिंद्याच्या मार्फत सालबाई येथें तह

होऊन सहा वर्षें चाललेलें इंग्रज—मराठे युद्ध बंद पडलें (१७८३). या तहानें दादाला इतकीं वर्षें इंग्रजांनीं दिलेला आधार तुटला. त्याचा या आधारामुळें कांहीं फायदा तर झालाच नाहीं; उलट जी नेमणूक पूर्वीं माधवराव किंवा बारभाई आपखुशीनें कबूल करीत होते तीपेक्षां कितीतरी कमी बसली. दरमहा पंचवीस हजार रुपये घेऊन कोठेंतरी मराठ्यांच्या मुलुखांत राहावयाचें; स्वतंत्रता नाहीं; गादीवर वंशाचाहि हक्क ठाम असा ठेवलेला नाहीं. बाजीरावास सवाई माधवरावा-जवळ ठेवण्याची दादाची इच्छा फार असे; पण तिला आतां कोण विचारतो? दुसऱ्यांदा सुरतेस आल्यापासून दादा फार खंगत चालला. शरीर परस्वाधीन होत गेलें. सुरतेस आल्या-नंतर केलेली तिसरी बायको मथुराबाई दोन वर्षांपूर्वीं देवीनें वारली. नाटकशाळा बऱ्याच होत्या. त्यांच्याशीं आनंदीबाईचीं फार भांडणें होत. तेव्हां दादा आनंदीबाईचें आठ आठ दिवस दर्शनसुद्धां घेत नसे. बाजीरावाला तिच्यापासून दूरदूर ठेवी. त्याच्या बुद्धीला भ्रंश झाला होता व अंग अनेक रोगांनीं व्यापिलें होतें. अशा करुणास्पद स्थितींत सुरत सोडून जाण्याला तो नाखूष होता. पण त्याला ताब्यांत घेतल्याखेरीज नाना तहावर सही करीना. कारण दादा पुन्हां बाहेर राहिल्यास काय खेंकटीं आणि खुळें उत्पन्न करील याचा नेम नव्हता. तेव्हां निरु-पायानें त्यानें सुरत सोडलें. पण आतां जावें कोठें ही पंचाईत

त्याला पडली. कारभाऱ्यांकडे पुण्यास जावें तर त्यांचा त्याला विश्वास नव्हता. उत्तर हिंदुस्थानांत शिंद्याकडे जाऊन राहावें तर गादीचा संबंध कायमचा तुटेल ही भीति. त्याला आनंदवल्लीस जाऊन राहावयाचें होतें पण गोपिकाबाई तेथून जवळच गंगापूरला राहात असल्यानें कारभारी तें ठिकाण मान्य करीनात. तेव्हां गोदातीरावरील कोंपरगांव अखेर पसंत करून तिकडे जाण्यास सहपरिवार तो निघाला. आतां त्याला पूर्ण पश्चात्ताप झालेला होता. "आजतागाईत मागील कित्येक गोष्टींविषयीं आमचे चित्तांत विरुद्ध होतें. परंतु आजपासून निखालसता झाली. तुम्हांविशीं मनांत आढ्या होत्या, त्या सोडल्या. पुढें तुम्हीं आम्हांशीं सरलतेनें चालावें. कपट धरूं नये. आम्हीही तुम्हांवर निःकपटें करून कृपा करूं. येविशीं श्रीसांबांची शपथ असे." असें त्यानें पुण्यास नानास पत्र लिहिलें. सखारामबापु दोन वर्षांपूर्वींच वारला होता. तेव्हां जुन्या कारभाऱ्यांपैकीं राहता राहिला नाना व हरिपंत फडके. हरिपंत त्याला घेऊन येण्यास धोडपपर्यंत गेलाच होता.

आपण आतां फार दिवस कांहीं वांचत नाहीं असें दादाला वाटूं लागलें होतें. तेव्हां लवकर कोपरगांवीं स्थाईक होण्यापूर्वीं, आईप्रमाणें आपल्याला असलेली वहिनी गोपिकाबाई, हिचें दर्शन घेण्याची त्याला फार इच्छा झाली. आतां वडील कायती तीच उरली होती. पण हरिपंत परवानगी विचारण्यास

गंगापूरला गेला असतां, "यास अनुताप झाला नाहीं. मी दर्शन घेत नाहीं. यास लोकलज्जा. तेव्हां पश्चात्ताप कांहीं नाहीं. लबाडी आहे. याची प्रकृति मजला ठाऊक आहे," असें गोपिकाबाईनें कठोरपणें उत्तर दिलें. तिच्या प्रत्यक्ष मुलाचा त्यानें अमानुषपणें खून करविलेला; तेव्हां ही तापसी आणि तामसी बाई अशा कपटनाटकी दिराला कशी बरें क्षमा करील? "माझ्या पोटांतील दुःख गेलें नाहीं. दादाचें दर्शन, त्याचा सहवास, अति दुःखप्रद आहे," असें तिला वाटणें स्वाभाविक होतें. शेवटीं रदबदली करतां, "आहे त्याप्रमाणें प्रायश्चित्त घेऊन एकटा येईल तर दर्शन होईल," अशी तोड तिनें सुचविली. आनंदीबाईनेंहि प्रायश्चित्त घेऊन जाऊबाईची खातरजमा करण्यास दादास सांगितलें. हा तिचा थोरपणाचा सल्ला होता, यांत संशय नाहीं. तेव्हां गोदा-दारणा यांच्या संगमावर सांगवी गांवीं दादानें सक्षौर प्रायश्चित्त घेतलें व नंतर गोपिकाबाईचें दर्शन घेऊन स्वारी कोपरगांवाजवळ असलेल्या कचेश्वरीं येऊन राहिली.



कोपरगांव येथील आनंदीबाईचा वाडा. याला 'विटाळशीचा वाडा' म्हणत.

[ श्री. य. रा. गुप्ते यांच्या कृपेनें ]

## १

# वैधव्यदशा आणि बंदीवास

कोपरगांवच्या परिसरांत कचेश्वरास दादाचा भव्य वाडा होता. गोदावरीच्या वळणदार प्रवाहामुळें त्यावेळीं हें स्थान बेटाप्रमाणें दिसे. म्हणून यास 'बेट कोपरगांव' म्हणत. गांवाजवळच शुक्रेश्वराचें रम्य स्थान होतें. हिंगणी गांवीं श्रीमुक्तेश्वराचें देवस्थान होतें; तेथें त्यानें दुसरा वाडा बांधण्यास काढला. संवत्छर, कोकमठाण, कुंभारी इत्यादि स्थळें भोंवतालीं असल्यानें व गोदावरी नदीचीं वाळवंटें बेटांप्रमाणें आल्हाद-दायक आणि क्रीडाकरमणुकीस योग्य असल्याकारणानें येथें दादानें आपला सर्व सरंजाम थाटला. पण त्याला फार दिवस या जगांत काढावयाचे नव्हते याला तो काय करणार! सन १७८३ च्या आगष्ट महिन्यांत तो येथें आला व ११ डिसेंबरला वारला. सरासरी चार महिनेच कायते त्याला राज्याच्या भानगडींशिवाय स्वस्थतेचे मिळाले. त्याचें वय पुरें पन्नासहि नव्हतें. पण सुमारें चाळीस वर्षें तो पेशवाईत प्रामुख्यानें

वागत होता. "साहेब यांचे पुण्य शरीर, पंधरावे वर्षीं गुजराथ प्रांतीं गेली आणि चौथाई बसविली. मोठी लढाई इतके दिवसांत यासिवाय फत्ते कोणी केली नाहीं," असें आनंदीबाईच नवऱ्याविषयीं आदरानें बोलतांना एके ठिकाणीं म्हणते. दादाच्या अंगीं गुणांपेक्षां दोषच फार, त्यामुळें मराठे साम्राज्यास त्याच्यापासून फार धोका पोंचला. घरांत यादवी उत्पन्न करून, इंग्रजांना हिंदुपतपातशाहीचें उच्चाटन करण्यास त्यानें चांगली मदत दिली. मराठ्यांचें साम्राज्य दादाच्या कृत्यांनीं खालावलें व मोडलें, असें म्हटल्यास फारसें खोटें ठरणार नाहीं. दादाचे अवगुण लक्ष्यांत येतांच आनंदीबाईची कर्तबगारी आणि शहाणपण हीं ढळकपणें दिसूं लागतात. तिच्या गुणांवर अशा नवऱ्यामुळें पाणी पडलें व उलट तिचा बदलौकिक झाला. नवऱ्याला सांभाळतां सांभाळतां तिला पुरेवाट झाली; एरवीं दौलतीची आणि घराण्याची प्रतिष्ठा राखण्याची तिला पुष्कळ काळजी होती. थोर पतिव्रतेप्रमाणें संकटकालांत ती नवऱ्याला सोडून राहात नसे; त्याच्या बऱ्यावाईट कार्यांत त्याला मदत करी व बुद्धिवाद शिकवी, हें आपण मागें पाहिलेंच. तीच खरी अभागी! एरवीं एवढी हुशारी आणि मुत्सद्देगिरी असतांना तिला नवऱ्याबरोबर व मागाहूनहि हाल-अपेष्टांत आयुष्य काढावें लागतें ना!

दादासाहेब वारला त्याच सालांत पेशवे घराण्यांतील पार्वतीबाई आणि सगुणाबाई या दोन जुन्या स्त्रिया वारल्या. तेव्हां अगदीं आरंभापासून घराण्यांतील चालीरीतींविषयीं माहिती असणारें बाईमाणूस शिल्लक राहिलें नाहीं. नाहीं म्हणावयाला एक जुनी अप्रसिद्ध बाई मात्र होती; ती म्हणजे बाळाजी विश्वनाथाच्या पुतण्याची बायको गोदूबाई. आनंदीबाई जुन्या चालीरीती काय होत्या तें तिला वेळेनुसार विचारी. "कैलासवासी थोरली सासूबाई (राधाबाई) काय काय कुळधर्म करीत होती तो तीर्थस्वरूप मातुश्री गोदावरी सासूबाईस पुसोन ल्याहावे," असें ती एकदां आपला उपाध्याय लक्ष्मणभट कर्वे यांस लिहिते. तिची एकुलती एक मुलगी दुर्गाबाई हीहि राघोबाच्या मरणापूर्वीं वारली. लग्नानंतर तिची व आईबापांची भेट नव्हती. तिची आठवण होऊन आनंदीबाई साहाजिकच तळतळून बोले: "आमचे मुलीची देखील भेट होऊं दिल्ही नाहीं. पूर्णवयांत आली हेंहि पाहों दिल्हें नाहीं. यांसहि मुलें आहेत. नाना मात्र येकटे आहेत. हरिपंताचीं मुलें लेंकरें आहेत. पेशजी हरिपंत आले तेव्हां विचारिलें. आसें होईल, हें ठाऊक नवतें आसें उत्तर केलें. यांचे मागील जन्मीं मुलाबाळास दुःख दिल्हे त्याचें उसणें याणी घेतलें. इतक्यानें जन्मांतर फिटलें आसें आम्हीं यांचे काय केलें होतें; परंतु येक चांगलें झालें. मूल

थोर जाली हें पाहिलें आसतें तर बहुत दु:ख होतें व पूर्वद्वेषांतून सुटलों. या दोन गोष्टी चांगल्या जाल्या !"

कोपरगांवीं आनंदीबाईवर कडक पहारा होता. तिचा रोजचा कार्यक्रम आणि ती बोलेल ते शब्द न् शब्द पुण्यास नानाकडे पाठविण्यासाठीं दोन कारकून नेमिले गेले होते. तिच्या कारस्थानी स्वभावाची भीति कारभाऱ्यांस वाटत होतीच. तेव्हां ते साहाजिकच फार काळजी घेत. कोपरगांवीं बंदींत असतांना देखील नानास पकडण्याच्या एका कटांत ती सामील होती; पण हा कट फसला. नानानें बाईला प्रत्यक्ष शासन कांहीं केलें नाहीं, फक्त जास्त नजर ठेविली. या बंदीबद्दल ती सारखी जळफळे व कारकुनांना फाडफाड बोले. हें सर्व बोलणें ते पुण्यास लिहून पाठवीत. बाहेरून बेटांत येणारास व बेटांतून बाहेर जाणारास परवानगी लागे. चौक्या बसविल्या होत्या. बाईचीं जीं कोणास पत्रें जात त्यांच्या नकला पुण्यास रवाना होत. बाईला सालीना दोन लाख रुपयांची नेमणूक होती. यापेक्षां जास्त पैसे लागल्यास विशिष्ट महत्त्वाच्या कारणावांचून मिळत नसत. बाईच्या जवळचा परिवार म्हणजे दत्तक मुलगा अमृतराव व त्याची बायको सावित्रीबाई, बाजीराव व त्याची नवीन लग्न केलेली बायको भागीरथीबाई, व दादाच्या नाटकशाळा. दादाच्या मृत्यूनंतर चार महिन्यांनीं चिमणाजी झाला; पण या वेळीं

बाजीरावाच्या जन्माच्या वेळेप्रमाणें सर्व किल्ल्यांस तोफा करविल्या नाहींत कीं साखराहि वांटल्या नाहींत. "पहिला एक वैरी होता त्याचा बंद केला होता. पुढें दुसरा वैरी निर्माण जाला आहे. त्यास दु:ख जाले; त्यामुळें शर्करा वाटणेयाचे विस्मरण जाले," असा बाईनें यावर टोमणा मारला आहे.

आनंदीबाई कोपरगांवीं १७८३ ते १७९२ पर्यंत होती. तिला कोपरगांवचा पुढें पुढें फार कंटाळा आला होता. आपणांस महायात्रेला धाडावें किंवा आनंद-वल्लीस तरी ठेवावें, असा तिनें सारखा हट्ट घेतला होता. कोपरगांवीं असतांना देवधर्मांत ती फार वेळ काढी व बराच खर्चहि करी. वाड्यांतील तिचा पुराणिक एकदां सप्तशृंगीस देवीच्या दर्शनास जाण्यापूर्वी तिचा निरोप घेण्यास आला असतां, तिनें त्याच्याबरोबर देवीस निरोप पाठविला कीं, "आमचे मुलाबालांचे नवस फार आहेत. आम्ही यावें तर आपलें स्वाधीन नाही. श्रीत्रिंबकेश्वराचेहि नवस आहेत. परंतु आमचे जाणें घडत नाहीं. आम्ही परस्वाधीन आहों. हा शब्द आम्हाकडे नाही. आम्ही माजोरीपणा करीत नाही. आमचें बरें होईल तेव्हां डोईचे वाटेनें चालत येऊं." तिला स्वत: लिहितां वाचतां येत असे. सप्तशतीचा पाठ ती तोंडानें म्हणे, पुराणश्रवण करी व आजूबाजूच्या देवांच्या दर्शनाला

जाई. सुनांकडून व्रतवैकल्यें करवी. चैत्र महिन्यांत वाड्यांत गौर बसे, तेव्हां कचेश्वर आणि कोपरगांव येथील सर्व बायका हळदीकुंकवास येत; तसेंच वसंतपूजेच्या दिवशीं वाड्यांत ब्राह्मणांची गर्दी होई. श्रावणमासीं पुण्यांतल्या रमण्याप्रमाणें कोपरगांवींहि थोडीफार दक्षणा वांटली जाई. १७८८ त सूर्यग्रहण पडलें असतां बाईस आपली तुला करून घेण्याची इच्छा झाली होती. तिला सर्वस्वदानाहि करावयाचें होतें. "कालाचे दिवस व्यर्थ जातात. सर्व दानधर्म स्वसत्तेशिवाय यथास्थित घडत नाही. आमचे मर्जीनरूप धर्मव्यवस्था घडत नाही. उगेच संशय धरितात. काय करावे? आम्ही किमपि वांकडी गोष्ट सहसा करित नाहीं," असें बाईचें पालुपद असे. १७८६ त बाजीरावाचें पहिलें लग्न व १७८९ त चिमाजीची मुंज अशीं दोन मोठीं कार्यें कोपरगांवीं तिनें केलीं. ती सुनांना चांगलें वागवी. अमृतरावावर तिचें फार प्रेम असे. तो चांगला जाणता होता. त्याच्याशीं ती विश्वास धरून मनमोकळेपणानें बोले. तो दादासाहेबाबरोबर सुरतेस आणि मुंबईस फार दिवस होता; व त्यानें त्यांचे बरेवाईट दिवस पाहिले होते. बाजीराव मात्र तिला फार छळीत असे. तो अभ्यास मुळींच करीत नसे. मोठ्या माणसाप्रमाणें धार्मिक उपवास-व्रतें करी. चातुर्मासांत मौनव्रत पाळीत असे. आईला दुरुत्तरें करी व लहान

वयांतच बायकांच्या मागें असे! हा मुलगा चांगला निघणार नाहीं, हें आनंदीबाईला कळून चुकलें होतें. ती याकरितां कारभाऱ्यांवर चडफडे. दुसरें काय करणार! चिमाजी मात्र गरीब असे. या दोघांना शिकविण्यासाठीं राघोपंत ठोसर म्हणून एक चांगला शिक्षक असे; त्याला या दोघांची प्रकृति चांगली माहीत होती. पण तो एकदां आपल्या तैनातीची व्यवस्था लावून घेण्यास पुण्यास जो गेला तो तिकडेच बरेच दिवस राहिला. त्याला लवकर धाडून देण्याविषयीं आनंदीबाई सारखीं पत्रें लिहवी. "कारभारी आहेत, यांतून कोणी जवळ आसावें तें नाहीं. मूल शहाणें होऊं नये, असें साऱ्यांस वाटतें." इत्यादि शब्द रागानें बडबडे. सवाई माधवरावाविषयीं ती कधीं कधीं मायेनें बोले. त्याच्यासाठीं कांहीं चांगल्या जिन्नसा पाठवी. बाईजवळ देवपूजेच्या वेळीं देव मांडण्याचा छत्तीस तोळे वजनाचा सोन्याचा एक सुंदर मोर होता. त्याचा रंग मिन्याचा व पिसारा पाचेचा होता. हा श्रीमंत राव-साहेबांकडे पाठविण्याची तिची फार इच्छा होती; पण चार महिने पुण्याहून परवानगीच आली नाहीं. शेवटीं तेवढाच जिन्नस उपाध्यायाबरोबर पाठविण्याची परवानगी मिळाली. मोराबरोबर एक पोवळ्याचा गणपति, दादासाहेबाची सांबाची पूजा करण्याची जडावाची झारी आणि तबकडी, व बाजी-रावाचें पत्र हीं त्याबरोबर दिलीं असतां 'आज्ञा नाहीं' म्हणून

कारकुनानें पुण्यास पाठविलीं नाहींत ! यांत कांहीं कपट असेल अशी पुण्याच्या कारभारी मंडळीस नेहेमीं तिच्याबद्दल शंका येई. ती सवाई माधवराव आणि नाना यांचें वाईट व्हावें या हेतूनें जपजाप्य, मंत्रतंत्र करते, स्वतः सप्तशतीचा पाठ वाचते, ब्राह्मणांकडून अभिषेक, अर्घ्यप्रदान वगैरे करविते, नवस बोलते, यांसारखा समज पुणें दरबारीं पसरला होता. मला बंधविमोचनाचा मंत्र ठाऊक आहे व त्याचा गुणहि अदमावून पाहिला आहे; पण भवितव्य चुकत नाहीं तेव्हां तो जपून काय होणार ! असें बाई कारकुनादेखत मुद्दाम बोलेहि.

आनंदीबाई कोपरगांवीं एके ठिकाणीं राहून फार कंटाळली. आनंदवल्लीला तिला ठेवण्याचें कारभाऱ्यांच्या मनांत होतें पण जवळ गोपिकाबाई गंगापुरास असेतोंपर्यंत तसें करणें इष्ट नव्हतें. कोपरगांवीं नेहमीं गंगेला पूर येत. दादासाहेबांना अग्नि दिला त्या जागेवर एक देवालय बांधलें होतें तेंहि पुरानें वाहून गेलें. बाजीराव तर पुरास फार भीत असे. त्या वेळीं घरांची सारखी पडापड होई. तेव्हां हें कोपरगांव सुटेल म्हणून महा-यात्रेला निघावें तर तीहि परवानगी होईना. "वरांतील म्हातारी भोंवते आहे," असें आनंदीबाई गोपिकाबाईला उद्देशून म्हणे. शेवटीं ३ आगष्ट १७८८ रोजीं गोपिकाबाई पंच-वटीस वारली. तिचें वय सुमारें ६३ वर्षांचें होतें. आनंदी-

बाईप्रमाणेंच हीहि फार कर्तबगार, महत्त्वाकांक्षी आणि मानी होती. पण दोघींच्याहि हातून कोणाचें कांहीं चांगलें झालें नाहीं. हा दैवयोग म्हणावयाचा. या दोघींमधील भांडणामुळेंच पेशव्यांच्या घरांत मोठी यादवी उत्पन्न होऊन दौलतीस कीड लागली, असें कांहीं इतिहासकार जें म्हणतात तें अगदींच खोटें नाहीं. असो.

गोपिकाबाईच्या मृत्यूची वार्ता कळतांच आनंदीबाईला वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. सवाई माधवरावाचें समाधान करण्यासाठीं पुढील दुखवट्याचा मजकूर लिहिण्यास तिनें सांगितलें : "चिरंजीवास आई बाप भाऊ कोणीच नाहीं. आम्हीं दूरच आहों. येक आजी तेहि दूरच होती. परंतु ममतेचे तेवढेच मनुश्य होतें. याअर्थी चिरंजीवास श्रम बहुत होतील. परंतु बहुत प्रकारें समजोन सांगावे. त्यांचाहि काल जाला होता. सृष्टीची वाट हीच आहे. त्यापक्षी अशा गोष्टी सांगोन त्याचे शांतवन होय ते करावे."

गोपिकाबाई वारली तरी चार वर्षेपर्यंत आनंदीबाईला कोपरगांवाहून हलविण्याचें ठरतच होतें. अखेरीस १७९२ सालच्या आक्टोबर महिन्यांत तिची सहपरिवार आनंदवल्लीस उचलबांगडी करण्यांत आली. तेथें ती जेमतेम १॥ वर्ष जगली. तिच्या पूर्वीच्या परिवारांत फरक म्हणजे अमृतरावास मुलगा (विनायकराव) झाला व बाजीरावाची बायको १७९३

मध्यें वारल्यानें लगेंच त्याचें दुसरें लग्न होऊन बाईला नवी सून आली. बाई आनंदवल्लीस जास्तच आजारी झाली, व २७ मार्च १७९४ रोजीं सूर्योदयाच्या सुमारास मृत्यु पावली. दोन दिवसांनीं लिहिलेल्या एका पत्रांत तिच्या अंतसमयाचें वर्णन आहे : "सायंकाळीं घाबरी झाली. नेत्रांस तटस्थता झाली म्हणोन दर्भास्तरणावर आली. नंतर गंगोदक मुखांत घातलें. घटकेनें किंचित् सावध झाली. हेमगर्भ मात्रा घातली, तेणें-करून स्थिर झाली. रात्रभर बाजीराव, चिमाजीआपा व अमृतराव जवळ बसले होते. उत्क्रांत धेनु सायंकाळींच दिली. प्रात:काळीं सूर्योदयाचे संधीस प्राणोत्क्रमण झालें. अखेरपर्यंत सावध होती. डोळे पुसणें, अंग खाजवणें, पदर नीट करणें, पाणी सांगणें, सर्व आपले हातें करी. गळ्यांत कफ होऊन शक्तिहीन झाल्यानें बोलणें राहिलें. पहिला देवपूजन व जप याचा अभ्यास फार होता, तोच अखेर-पर्यंत नमस्कार, न्यास करावे, असा छंद लागला होता"

याप्रमाणें आनंदीबाईचा ग्रंथ आटोपला! ती फार म्हातारी झाली नव्हती; वय सारें सत्तेचाळीस होतें. पण लहानपणापासून दादा आणि दौलत यांची एकसारखी काळजी असल्यानें, व वनवास-बंदिवासाचे हाल सोसावे लागल्यानें शरीर लवकर क्षीण झालें. त्यांतून पुढें चांगले दिवस येतील हीहि आशा नव्हती. पण तिच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनींच तिचा बाजीराव पेशवेपदावर अचानक आला. याला म्हणतात दैवयोग किंवा योगायोग!

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्र. ... दि. ...

## १०

# शेवटीं काय ?

तर 'स्त्रियः चरित्रं पुरुषस्य भाग्यं'—स्त्रीचें चरित्र आणि पुरुषाचें भाग्य हीं अगम्य असतात. तेव्हां आनंदीबाई-सारख्या अति हुषार आणि कर्तृत्ववान् स्त्रीचा असा शेवट कां झाला हें नक्की सांगावें कसें ? अपेशी माणसाचे गुणहि दोषांमध्यें गणले जातात. यश लाभल्यास दोषांचे गुण होतात. आनंदीबाईचा नुसता दुर्लौकिकच पसरला आहे. तिनें 'ध'चा 'मा' करून आपल्या पुतण्याचा खून करविला, हा एकच मोठा आरोप तिच्यावर ठेवून तिच्याकडे समाजानें आतांपर्यंत पाठ फिरविली आहे. खरोखरीं तिचा गुन्हा किती तोलाचा व तो प्राप्तपरिस्थितींत क्षम्य ठरतो कीं नाहीं, यांकडे कोणीच पाहात नाहीं. ऐकीव परंपरागत माहितीवर भागविलें जातें. प्रत्येक माणसांत गुणदोष असतातच; स्वार्थहि कमीअधिक प्रमाणांत असतो. तेव्हां त्यांची छाननी करून व कार्यकारणभाव ध्यानांत घेऊन माणसाची

किंमत ठरविली पाहिजे. असो. शेवटीं सांगावयाचें तात्पर्य, आनंदीबाईची विलक्षण हुशारी, धाडस, कुलाचा अभिमान, नवऱ्याविषयीं एकनिष्ठता, मुलें चांगलीं निघावीं म्हणून तिनें घेतलेली दक्षता, धर्मावरची तिची अत्यंत श्रद्धा, स्पष्ट-वक्तेपणा, मुत्सद्देगिरी, प्रसंगावधान इत्यादि चांगल्या गोष्टी मनांत वागवून, आनंदीबाई ही पेशवे घराण्यांत एक थोर स्त्री होऊन गेली असें समजण्यास व सांगण्यास शिका.

# परिशिष्ट

## आनंदीबाईचे अनुभवाचे बोल

१. पेंचाविसी मुक्तता होण्याचा उद्योग करीतच असावें. जे होणे ते होऊ.

२. स्वसत्तेत जन्म गेला, यामुळें परस्वाधीनता साहवत नाही.

३. आम्हीं केवढीं माणसें होतो आणि कोणत्या योग्यतेस आलो. आन्याय कोणी पाहात नाही.

४. राज्यास ममता आसली तर यथास्तित चालत नाहीं याचा आनुभव आम्ही घेतला.

५. श्रीरामचंद्रानें अवतार धरिला परंतु कर्म संनिधच होतें. रावणादिकाच्या पीडा जाल्या परंतु शेवटीं रामचंद्र याणे भूभार काढिला. तस्मात् त्याची सत्ता हेंच खरें.

६. पर्जन्यादिक दुष्काळ पडतात. त्यास अधिकारी याणी निग्रह केले पाहिजेत. आम्हाकडे आसते तर आम्ही उपोषणेच केली असती.

७. चांगले ग्रह आसले तर त्यांचें फल येत नाहीं, वाईट आहेत त्यांचें फल येतें.

८. पहिल्या ममता किंवा अगत्यें ही सर्वं गेलीं.

९. राज्याची आशी तऱ्हा असते कीं दुसऱ्या राज्यासीं वाईटपणा असल्यास त्यास युद्धामध्यें धरावें आणि परागंदा होऊन आल्यास त्याचें संरक्षण करावें असा धर्म आहे.

१०. कलियुगांत निमकहरामी केल्यानें येश येतें हें खरें !

[पेशवे दप्तर ४, आनंदीबाईंची दिनचर्या, यांतून निवड]

# श्रीसयाजी बालज्ञानमाला

## ऐतिहासिक चरित्रें

| | | | |
|---|---|---|---|
| १ | (४) | महाराणा प्रताप. रमणलाल वसंतलाल देसाई, एम्. ए. (१९१९–१९२२) | ०–६–० |
| २ | (८) | औरंगजेब. मनसुखराम मोहनलाल पोटा, बी. ए. (१९१९–१९२२) | ०–६–० |
| ३ | (१०) | रणजितसिंह. भरतराम भानुसुखराम महेता, ओ. टी. सी. ई. (१९२०–१९२३) | ०–६–० |
| ४ | (११) | श्रीहर्ष. भरतराम भानुसुखराम महेता (१९२०–१९२२) | ०–६–० |
| ५ | (१६) | बाल नेपोलियन. दिनकरराय पुरुषोत्तमराय जोषीपुरा (१९१९–१९२५) | ०–६–० |
| ६ | (१९) | श्रीहर्ष. आनंदप्रिय आत्मारामजी, बी. ए., एल्एल्. बी. [हिंदी] (१९२१) | ०–८–० |
| ७ | (२४) | लॉर्ड विलियम बेन्टिक. हीरालाल हरजीवन गणात्रा बी.ए.,एल्एल्.बी, सॉलिसिटर (१९२२) | ०–६–० |

८ (२५) नाना फडनवीस. रमणलाल वसंतलाल देसाई,
एम. ए. (१९२२) ०—६—०

९ (२८) महादजी सिंधिया. वल्लभराय लालशंकर
छाया, बी. ए. (१९२२) ०—६—०

१० (३४) बाल बाबर. मनसुखलाल मोहनलाल पोटा,
बी. ए. (१९२३) ०—६—०

११ (४१) विलियम युवर्ट ग्लॅडस्टन. हीरालाल हरजीवन गणात्रा,
बी.ए.,एल्एल्.बी., सॉलिसिटर (१९२४) ०—६—०

१२ (४२) शूरवीर शिवाजी. भरतराम भानुसुखराम
महेता, ओ. टी. सी. ई. (१९२४) ०—६—०

१३ (४७) छत्रपति संभाजी महाराज. केशव मंगेश
रांगणेकर, बी. ए. [मराठी] (१९२४) ०—६—०

१४ (४८) महाराणा प्रताप. परशुराम गोविंद काटदरे
[मराठी] ०—६—०

१५ (५१) डयूक ऑफ् वेलिंग्टन. हीरालाल हरजीवन गणात्रा,
बी.ए.,एल्एल्.बी., सॉलिसिटर (१९२४) ०—६—०

१६ (६४) औरंगजेब. आनंदप्रिय आत्माराम पंडित,
बी.ए.,एल्एल्.बी. [हिन्दी] (१९२६) ०—८—०

१७ (६६) चक्रवर्ती अशोक. हरिराय भगवंतराय बुच ०—६—०

१८ (६७) बाल बाबर. विष्णु पांडुरंग नेने, बी. ए.
[मराठी] ०—६—०

१९ (७७) विलयम एडवर्ट ग्लडस्टन. विष्णु पांडुरंग
नेने, बी. ए. [मराठी] (१९२७) ०—६—०

२० (८९) अशोक. विष्णु पांडुरंग नेगे, बी. ए.
[मराठी] ०—५—०
२१ (९७) आपणा महाराजा.—चंद्रशंकर म. भट्ट. ०—६—०
२२ (९८) कोलम्बस—(सचित्र) ०—६—०
२३(१०३) कर्ण. कवि रामराव मार्तंड भांबुरकर[मराठी] ०—६—०
२४(१०५) रामदास—कवि रामराव मार्तंड भांबुरकर
[मराठी] ०—६—०
२५(१०७) झांशीची शूर राणी लक्ष्मीबाई.
श्रीमती लक्ष्मीबाई प्रधान [मराठी](१९३३)०—६—०
२६(१०९) भीष्म. वि. वा. जोशी [मराठी] (१९३३)०—३—०
२७(११४) एलिचपूर य. खु. देशपांडे [मराठी]
(१९३४) ०—६—०
२८(११५) चक्रधर. दत्तात्रेय सीताराम पंगु, एम्.ए.
राजाराम कॉलेज [मराठी] (१९३४) ०—४—०
२९(१२४) विमळशाह. धीरजलाल टोकरशी शाह
(१९३५) ०—६—०
३०(१३२) वस्तुपाळ तेजपाळ. धीरजलाल टोकरशी
शाह (१९३५) ०—६—०
३१(१३५) मीराबाई. सौ. पुष्पा र. वकील, बी. ए.
(१९३५) ०—५—०
३२(१३८) हेमचंद्राचार्य. पंडित बेचरदास दोशी
(१९३५) ०—८—०

३३(१४५) चंद्रहास. रा. सा. ईश्वरलाल खानसाहेब, बी. ए. (१९३७) ०–६–०

३४(१४८) महमद बेगडो. प्रो. एम्. एफ्. लोखंडवाला, एम्. ए. (१९३७) ०–६–०

३५(१५५) सुलतान बहादुरशाह. प्रो. एम्. एफ्. लोखंडवाला, एम्.ए. (१९३८) ०–६–०

३६(१५६) आनंदीबाई पेशवे. चिं. ग. कर्वे, बी. ए. [मराठी] (१९४०) ०–६–०

म. ग्रं. [illegible] ठाणे, वाचनालय शाखा.
[illegible]

IRBK-0101690

म. ग्रं. सं. ठाणे.